**किरकोळ फौ.अर्ज क्रं. १४९/२०१७**
**वंदना विरुध्द मधुसुदन**
**निशानी क्र. ३३.**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांचा उलटतपास गैरअर्जदाराचे वकिल श्री. ए. एस. रेवतकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, माझे तिन्ही मुलं १८ वर्षाच्या वर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी निकीता हिचे लग्न ३ वर्षांपूर्वी झाले आहे, परंतु ती सध्या आमच्याकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, निकीता तिच्या पतीकडे राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी निकीताला तिच्या पतीकडुन माझ्याकडे घेऊन आली. साक्षीदार स्वतःहून सांगते की, निकीता तिच्या मुलीसोबत स्वतःहून आली. निकीताने तिच्या पतीविरूध्द खावटीची केस टाकलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारापासून मी स्वतः वेगळी झाली. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार मला पूर्वी सुध्दा व सध्या सुध्दा सोबत ठेवण्यासाठी इच्छूक व तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी गैरअर्जदाराच्याच घरी राहते. मी होमगार्ड म्हणून अरोली पो.स्टे.ला दोन वर्षे काम केले. हे म्हणणे खरे आहे की, माझे माहेर श्रीखंडा गावाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या माहेरी माझ्या नावाने शेतजमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्रीखंडा येथे माझ्या नावाने शेती आहे व ती मी बटाईने देते.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा माझा मुलगा प्रज्ञाशिल याला खर्चासाठी पैसे देत असतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुलं शिक्षण करून काम करू शकतात व माझे पालन–पोशन करू शकतात. गैरअर्जदाराकडे गाडी नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार बोरगावपर्यंत सायकलने येतो. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराची आई म्हातारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराचे वडील व भाऊ मरण पावले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामधून मी मयत गैरअर्जदारांचे नाव कमी केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीचे लग्न झाल्यानंतर सुध्दा मी सदर खटल्यामधून तिचे नाव कमी केलेले नाही.

**<u>गैरअर्जदार क्र.१ चे विद्वान वकील श्री. ए. एस. रेवतकर यांच्या लेखी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब</u>.**

श्रवणोत्तर स्वीकृत
मौदा.
दिनांक : ०९.०४.२०२६

समक्ष
Sd/–
**(एन. के. वानखडे)**
सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
मौदा.